सोमवार
दि. २६ सप्टेबर २०२२
मुल्य २ /- रूपये
पृष्ठ ४
वर्ष ५ वे अंक ३९
RNI. MAHMAR/2018/77866
मराठी साप्ताहिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com
संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे




## कामगारांच्या मागण्यासंदर्भात पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी
# कर्नाटक एम्टाच्या अधिकाऱ्यांना सुनावले

**चंद्रपूर/ प्रतिनिधी**
भद्रावती तालुक्यातील बरांज येथे असलेल्या कर्नाटक एम्टा कंपनीतील कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यासंदर्भात पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी कंपनीच्या अधिकाऱ्यांना चांगलेच सुनावले. या कामगारांच्या मागण्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असून कंपनी व्यवस्थापन त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे गावकऱ्यांनी निदर्शनास आणून दिले. यावर पालकमंत्री यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला.



कंपनीच्या खाणीमध्ये आतापर्यंत १० कामगारांचा मृत्यु झाला. मात्र केवळ सहा जणांनाच आर्थिक लाभ मिळाला असून उर्वरीत चार जणांना कधी लाभ देणार, अशी विचारणा पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना केली. तीन दिवसांत संबंधित कुटुंबाला नुकसानभरपाई मिळणे अपेक्षित होते. येत्या मंगळवारपर्यंत हा लाभ संबंधित कुटुंबाला मिळाला पाहिजे. पुनर्वसनास प्राप्त असलेल्या प्रकल्पग्रस्तांची यादी त्वरीत अंतिम करा. ब्लास्टिंग करतांना काही कामगारांच्या घराच्या भिंतीला तडे गेले आहे. त्याची नुकसानभरपाई कंपनीने तात्काळ द्यावी. तसेच यापुढे ब्लास्टिंगमुळे भिंतींना भेगा पडणार नाही, याची काळजी घ्यावी, असे निर्देश मुनगंटीवार यांनी दिले. यावेळी गावकऱ्यांनी सुधारीत नियुक्ती पत्र, किमान कोल वेतन, आंदोलनात सहभागी झालेल्या २५ जणांना नोकरीत सामावून घेणे, कामगारांसाठी घरे, पिण्याच्या शुध्द पाण्यासाठी आर.ओ. मशीन, गावात मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देणे आदी मागण्या कंपनीकडे केल्या.

केंद्रीय कोळसामंत्री प्रल्हाद जोशी यांच्या बैठकीत मान्य झालेल्या मागण्या नंतरही सुधारीत नियुक्तीपत्र का दिले नाही. तसेच हजारीबाग (झारखंड) येथे असलेल्या त्रिवेणी माईन्सच्या धर्तीवर कामगारांचे किमान वेतन का लागू केले नाही. किमान कोल वेतनानुसार कामगारांचे वेतन ठरविणे आवश्यक आहे. यासंदर्भात २१ जुलै २०२२ रोजी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली कामगारांच्या किमान कोल वेतनाबाबत बैठक घेण्यात आली. मात्र तरीसुध्दा कर्नाटक एम्टा याबाबत चालढकल करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. याबाबत लवकरच राज्य सरकार, कर्नाटक सरकार, एम्टा कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी मुंबईत बैठक घेतली जाईल, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

बैठकीला सहाय्यक जिल्हाधिकारी रोहन घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी विशालकुमार मेश्राम, वरोराचे उपविभागीय अधिकारी सुभाष शिंदे, जिल्हा खनिकर्म अधिकारी नैताम, भाजप जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे यांच्यासह मोठ्या संख्येने बरांज येथील गावकरी उपस्थित होते.




# विदर्भ राज्य व्हावे, याकरीता पुनश्च एकदा एल्गार : राजकीय चाणक्य प्रशांत किशोर

## राजकीय चाणक्य प्रशांत किशोर सह विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांची भेट

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
वेगळ्या विदर्भ राज्यासाठी (दि.२०) ला नागपूर येथील चिटनविस सेंटर मधे बैठक संपन्न झाली. सदर बैठक ही आशीष देशमुख यांनी आयोजित केलेली होती.

यावेळी राजकीय चाणक्य प्रशांत किशोर, विदर्भवादी ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे व इतर विदर्भवादी तथा राजकीय नेते उपस्थित होते.



विदर्भ राज्य ही स्वातंत्र्यापूर्वीपासूनची मागणी आहे. अखंड महाराष्ट्र राज्यात विदर्भावर सातत्याने अन्याय होत आलेला आहे. प्रत्येक क्षेत्रात विदर्भाचा अनुशेष वाढत चालला असून आता तो भरून निघण्यासारखा नाही. अनेक नैसर्गिक, भौगोलिक, खनिज संसाधने ही विदर्भ प्रांतात आहे. याचा उपयोग महाराष्ट्रासह देशाला होतो. मात्र त्या तुलनेत विदर्भ प्रांताला म्हणावा तसा फायदा झालेला नाही. शिक्षण, रोजगार, नोकरी, शेती, सिंचन, उद्योग, प्रदूषण, मानवी स्वास्थ्य, वन व वन्यजीव, भौतिक सुविधा आदी बाबतीत अनेक प्रश्न विदर्भात अनुत्तरीत आहेत. अशा सर्व परिस्थितीत वेगळे विदर्भ राज्य होणे ही काळाची गरज आहे. यासाठी सदर सभेत विचारमंथन घडून आले. तथा विदर्भ राज्य व्हावे, याकरीता एकजूट करावी, असे आवाहन करण्यात आले.

जून २०२३ व डिसेंबर २०२३ अशा दोन टप्प्यात आंदोलनांची स्ट्रेटेजी ठरविल्या जाईल व विदर्भ राज्यासाठी लढा उभारला जाईल, असे या बैठकीत ठरले.

या बैठकीने एक नवीन उमेद जागी झाली असे डॉ. अशोक जीवतोडे म्हणाले.

# सीईटी परीक्षेत राज्यातून प्रथम येणाऱ्या प्राजक्ता लिहितकर चा शिवसेनेकडून सन्मान

**वरोरा / प्रतिनिधी**
तालुक्यातील भेंडाळा या छोट्या गावातील प्राजक्ता लिहितकर या दिशा एज्युकेशन पॉईंट च्या विद्यार्थीनीने नीट परीक्षेतील घवघवीत यशा नंतर एमएचटी सीईटी परीक्षेत ९९.९९ परसेंटाईल गुण घेऊन अनुसूचित जाती प्रवर्गातून महाराष्ट्रात प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. यामुळे शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे यांनी तिच्या घरी जाऊन शाल, श्रीफळ व भेटवस्तू देऊन सत्कार केला आहे.



वरोरा तालुक्यातील भेंडाळा येथील प्राजक्ता प्रकाश लीहितकर या वरोरा येथील दिशा एज्युकेशन पॉईटच्या विद्यार्थिनीने एमएचटी सीईटी परीक्षेत ९९.९९ पर्सेंटाइल गुण घेऊन अनुसूचित जाती प्रवर्गातून महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकाविला.नीट सारख्या राष्ट्रीय स्तरीय परीक्षेत प्रथम प्रयत्नात प्राजकताने ६०२ गुण मिळवून एम्स सारख्या वैद्यकीय महाविद्यालयात आपला प्रवेश आलीकडेच निश्चित केला आहे. तिने हे घवघवीत यश संपादन करून वरोरा तालुक्याचा बहुमान वाढवला असल्याने शिवसेना जिल्हाप्रमुख मुकेश जीवतोडे यांनी शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांसह भेंडाळा येथे तिच्या घरी जाऊन आई-वडिलांसह तिचा शाळ श्रीफळ व भेटवस्तू देऊन सन्मान केला. या प्रसंगी शिवसेना जिल्हा प्रमुख मुकेश जीवतोडे, उपजिल्हा प्रमुख, अमित निब्रड, युवासेना जिल्हा चिटणीस मनीष जेठाणी, ज्येष्ठ शीवसैनिक बंडु डाखरे,शहर प्रमुख संदीप मेश्राम, नगरसेवक दिनेश यादव, उपसरपंच वाळके, रवी वाटकर, खंगार, पेटकर उपस्थित होते.

# खासदार, आमदार धानोरकर दाम्पत्यांच्या प्रयत्नाने मिळाली पोचमार्गावरील पुलाला संजीवनी

## खासदार बाळू धानोरकर, आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते ३ कोटी ९२ लाख निधीच्या कामाचे भूमिपूजन

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
अनेक वर्षांपासूनच्या लहान पूल असल्याने पावसाळयात शेकडो गावांच्या संपर्क तुटला जातो. हि बाब अत्यंत गंभीर असून आरोग्य व इतर सोई सुविधा उपलब्ध करून देणे कठीण होत असते. असाच एक वरोरा तालुक्यातील पुलामुळे देखील शेकडो गावांतील ग्रामस्थांना त्रासाला सामोरे जावे लागत होते. हि बाब लक्षात येताच खासदार बाळू धानोरकर व आमदार प्रतिभा धानोरकर यांनी पाठपुरावा करून ३ कोटी ९२ लाख ८७ हजार ७२३ निधी उपलब्ध करून पोचमार्गावरील पुलाला संजीवनी मिळाली आहे.



चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा तालुक्यातील केंद्रीय मार्ग निधी सन २०२१-२२ अंतर्गत कोंढा-पाटी - माजरी - दहेगाव- डोंगरगाव ते प्रतिमा -५ रस्त्यावर प्रजिमा -९ सा. क्र. ४१ / ०० मध्ये दहेगाव गावाजवळील पुलाची पोचमार्गासह पुर्नबांधणी करण्याच्या कामाला ३ कोटी ९२ लक्ष ८७ हजार ७२३ रुपये निधी खासदार बाळू धानोरकर व आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या प्रयत्नाने मंजूर झाले.या कामाचे भूमिपूजन खासदार बाळू धानोरकर व आमदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते करण्यात आले. .

यावेळी सरपंच विशाल पारखी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता मेढे, शाखा अभियंता सारिखा,सामाजिक कार्यकर्ते बसंत सिंग, उपसरपंच कविता गुगल, ग्रामसेवक पी. एम. लांजेवार, युवक तालुका अध्यक्ष प्रफुल असुटकर, जेष्ठ काँग्रेस नेते जगलू पाटील साळवे, गजानन मावळे, विठ्ठल बुधाने, सागर चिंचोलकर, योगेश लोहकरे यांची उपस्थिती होती.

पुढे देखील लोकसभा क्षेत्रातील असे जे पूल पाण्याखाली जाऊन शेकडो गावांच्या संपर्क तुटत असतो. अशा पुलाचा कामांना निधी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे याप्रसंगी खासदार बाळू धानोरकर यांनी सांगितले.

# वरोऱ्याचे आरएफओ राठोडकडून वनरक्षकाला चाकूने भोसकण्याची धमकी

## वनविभागाच्या वर्तुळात वादग्रस्त आरएफओच्या कृत्यामुळे खळबळ

**चंद्रपूर / प्रतिनिधी**
सावली व ताडोबाच्या बफर क्षेत्रात अत्यंत वादग्रस्त कारकिर्द राहिलेले वनपरिक्षेत्र अधिकारी एम. पी. राठोड यांची अरेरावी वरोऱ्यातही सुरू आहे. कर्मचाऱ्यांना वेठीस धरून नियमबाह्य कामे करण्याचे प्रकार त्यांच्यासाठी नवे नाही. मात्र, त्यांच्याच अधिनस्त असलेल्या एका वनरक्षकाला इतर कर्मचाऱ्यांसमोर अर्वाच्च शब्दात शिविगाळ करून चाकूने भोसकण्याची धमकी आरएफओ राठोड यांच्याकडून देण्यात आल्याने वनविभागाच्या वर्तुळात त्यांच्या कृत्यामुळे पुन्हा खळबळ उडाली आहे. दरम्यान, या प्रकाराने मानसिक धक्का बसलेल्या वनरक्षकाने वनमंत्री, मुख्य वनसंरक्षकांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार केली आहे.

वरोरा येथील वनपरिक्षेत्र अधिकारी एम. पी. राठोड यांच्याकडून कर्मचाऱ्यांना सुडाच्या भावनेने वागणूक दिली जाते. एखाद्या कर्मचाऱ्याचा वचपा काढण्यासाठी आरएफओ राठोड कोणताही स्तर गाठत असल्याचे या प्रकारावरून समोर आले. वरोरा तालुक्यातील रामपूर नियतक्षेत्राचे वनरक्षक संदीप दादाजी वाटेकर यांच्याबाबतही असाच प्रकार घडला असून, आपल्या कुटूंबीयांच्या जीवितास काही धोका झाल्यास आरएफओ राठोड हेच जबाबदार राहणार असल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. दरम्यान, पाच दिवसांपूर्वी टेमुर्डा येथील क्षेत्र सहाय्यकांच्या कार्यालयातच हा प्रकार घडला असून, यावेळी वरोरा वनपरिक्षेत्रातील इतर अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते. एका वनपालाने आरएफओ राठोड यांना समजाविण्याचा प्रयत्न केला असता त्यांनाही न जुमानता एकदम खालच्या स्तरावर वनरक्षकाला शिवीगाळ करून चाकूहल्ला करण्याची धमकी दिली आहे. त्यामुळे वनविभागातील एखादया आरएफओकडून असे कृत्य होत असेल तर कर्मचाऱ्यांनी कसे काम करायचे, असा सवाल उपस्थित करून कारवाई करण्याची मागणी केली आहे. दरम्यान, वनविभागातील कर्मचाऱ्यांच्या संघटनेमार्फतही यापूर्वी राठोड यांच्याविरोधात अनेक तक्रारी करण्यात आल्या आहे.

वनपरिक्षेत्र अधिकारी एम. पी. राठोड हे यापूर्वी सावली वनपरिक्षेत्र व बफर क्षेत्रात कार्यरत होते. त्या ठिकाणीसुद्धा कर्मचाऱ्यांमध्ये भांडणे लावून उलट सुलट कामे करीत दबाव टाकण्याचे प्रकार केले आहे. त्यांनी छळ केल्यामुळे वनपाल कोलाम यांचा बळीसुद्धा गेला आहे. त्यांची संपूर्ण कारकीर्द वादग्रस्त राहिली असून, दबाव टाकून नियमबाह्य कामे केली आहे. यातून त्यांनी बेहिशेबी माया जमविली आहे. त्याचाही भंडाफोड केला जाणार असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यामुळे आरएफओ राठोड यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अन्यथा माझे अथवा कुटूंबाचे नुकसान झाल्यास शासन जबाबदार राहणार असल्याचे तक्रारीत नमूद केले आहे. दरम्यान, यापूर्वी एका मंत्र्याचा धाक दाखवून आरएफओ राठोड यांनी आपली बाजू झाकून घेतली होती. परंतु, सातत्याने असे प्रकार होत असून, कोणत्याही कर्मचाऱ्यांचा त्यांच्या वागणुकीमुळे जीव जाण्याची शक्यता असल्याने मुख्य वनसंरक्षक त्यांच्यावर काय कारवाई करतात, याकडे वनविभागाच्या वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### चुकीच्या नावाने टाकले माहितीचे अधिकार

आरएफओ राठोड यांच्याकडून शिविगाळ करीत धमकी दिलेल्या वनरक्षकाच्या नियतक्षेत्रातील केवळ पाच संयुक्त वनव्यवस्थापन समित्यांबाबत माहितीचे अधिकार टाकण्यात आले आहे. याबाबतचे उत्तर वनरक्षकाने तयार करून संबंधित पत्त्यांवर पाठविले असता त्या नावाचे व्यक्ती अस्तीत्वातच नसल्याचे निदर्शनास आले. काही मोबाइल क्रमांक केरळ, बिहार व छत्तीसगड राज्यातील असल्याचेही आढळून आले. सदर वनरक्षकाने याबाबत शहानिशा केली असता वनपरिक्षेत्र कार्यालयातीलच वनपाल व हंगामी मजुरांच्या हस्ताक्षराचे ते अर्ज असल्याची शंका आहे. यावरून हे कृत्यसुद्धा आरएफओ राठोड यांनी केल्याचा आरोप वनरक्षकाने केला आहे.

# शेतकऱ्यांना प्रोत्साहन राशी व पिकाविम्याचे पैसे त्वरित द्या

## मनसेचे मुख्यमंत्री शिंदे यांना उपविभागीय अधिकारी वरोरा यांच्या मार्फत निवेदन.

**वरोरा / प्रतिनिधी**
वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्रात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतापिकांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना शासनातर्फे त्वरित आर्थिक मदत देण्यात आली नसल्याने व पंतप्रधान पीक विम्यासह प्रोत्साहन अनुदान शेतकऱ्यांना मिळाले नसल्याने महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत दिनांक २३ सप्टेंबरला निवेदन देण्यात आले जर शासनाने याबाबत त्वरित निर्णय घेतला नाही तर मनसे स्टाईल आंदोलन करण्यात येईल असा इशारा मनसे तर्फे देण्यात आला आहे.



चंद्रपूर जिल्ह्यासह वरोरा भद्रावती विधानसभा क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या शेतपिकाचे अतिवृष्टी मुळे मोठे नुकसान झाले आहे, त्या शेतपिकांच्या नुकसानीचे पंचनामे सुद्धा प्रशासनाने केले मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून जी हेक्टरी १३७०० रुपये जाहीर झाले ते मिळाले नाही, सोबतच पंतप्रधान पीक विमा योजनेतर्गत शेतकऱ्यानी विमा भरला असताना सुद्धा तो त्यांना मिळाला नाही, त्यामुळे खरीप हंगाम हा शेतकऱ्यांचा वाया गेला व येणारा रब्बी हंगाम सुद्धा शेतकऱ्याकडे बियाण्यासाठी पैसे नसल्याने वाया जाण्याच्या उंबरठ्यावर आहे अशा परिस्थितीत शेतकऱ्यावर आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. त्यातच ठाकरे सरकारने नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन अनुदान म्हणून ५० हजार रुपये देण्याची घोषणा केली ती पण दिली नाही त्यामुळे शेतकऱ्यांची शासन प्रशासन एक प्रकारची थट्टा करत असल्याने या विरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना आता मैदानात उतरली असन शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई देण्यात यावी, पीक विम्याचे पैसे देण्यात यावे व प्रोत्साहन राशी बँक खात्यात जमा करावी अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण सेना मनसे स्टाईल आंदोलन करेल असा इशारा मनसेचे जेष्ठ नेते रमेश राजूरकर, मनसे जिल्हा उपाध्यक्ष राजू कुकडे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना उपविभागीय अधिकारी वरोरा यांच्या मार्फत दिलेल्या निवेदनात केला आहे.

या निवेदनात वरोरा चिमूर या सिमेंट रस्त्याचे काम ज्या एसआरके कंपनीने केले त्यात पावसाळ्याच्या पाण्याचे योग्य नियोजन न केल्यामुळे सालोरी जवळील नाल्याचे पाणी सरळ आजूबाजूच्या किमान पाच ते सहा गावातील शेतकऱ्यांच्या शेतात गेले व त्यामुळे शेतकऱ्यांचे धान पीक व कपाशी चे पीक वाहून गेले त्यामुळे त्या शेतकऱ्यांच्या शेत पिकांचे पंचनामे करून त्यांना योग्य तो मोबदला देण्यात यावा अशी सुद्धा मागणी सदर निवेदनात करण्यात आली आहे, या प्रसंगी मनसे जिल्हा सचिव विनोद सोनटक्के, तालूका अध्यक्ष वैभव डहाने, भद्रावती तालुका अध्यक्ष रोहित वाभिटकर, मनसे महिला तालुका अध्यक्षा रेवती इंगोले, शहर संघटिका ज्योती मुंजे शहर उपाध्यक्ष शुभांगी मोगरे, वरोरा शहर उपाध्यक्ष कुणाल गौरकार, कुलदीप श्रीरामे, प्रमोद हनवते व इतर मनसे पदाधिकारी व मनसे कार्यकर्त्यांची उपास्थिती होती.

# सोलापूर पीक पद्धती बदलतेय; आंबा लागवडीकडे कल

सोलापूर जिल्ह्यात ज्वारी, मका, तूर, बाजरी, सोयाबीन, उडीद याव्यतिरिक्त क्वचितच पिकाची लागवड शेतकरी करायचे. पावसावर पिके अवलंबून होती. उजनी धरण, भीमा, सीना नदी, तलाव, पाटबंधाऱ्यांच्या कामामुळे हळूहळू जिल्ह्यात बागायत क्षेत्र वाढले. उसाचे क्षेत्र सर्वात जास्त झाले. यापाठोपाठ शेतकरी द्राक्षे, डाळिंब आणि केळी ही फळपिकेही घेत आहेत. उसाला जादा पाणी लागत असल्याने आणि जमिनीचा कसं कमी होत असल्याने जिल्ह्यातील शेतकरी आंबा लागवडीकडे वळू लागला आहे. अवीट गोडीच्या या फळाला महाराष्ट्रात कोकणचा राजा म्हणतात. कोकणचा राजा आता सोलापूर जिल्ह्यातही वेगाने वाढत आहे.



धोंडिराम अर्जुन,
माहिती सहायक,
जिल्हा माहिती कार्यालय, सोलापूर.

सोलापूर जिल्ह्यात उन्हाळ्यात तापमान ४० अंश सेल्सिअसच्यावर असते. आंबा पिकाला लागणारे तापमान, खडकाळ जमीन आणि कमी पाणी यामुळे शेतकऱ्यांनी आंबा लागवडीकडे लक्ष देण्यास सुरूवात केली आहे. शास्त्रीय आणि आधुनिक तंत्रज्ञान वापरून शेती केली तर कधीच तोट्यात येत नाही. शास्त्रीय माहिती, तंत्रज्ञान कृषी विभाग शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवित आहे, मात्र अंमलबजावणी करण्यात शेतकरी पुढे येताना दिसत नाहीत. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कमी पाण्यात, आधुनिक तंत्रज्ञान वापरून शेती केली तर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणार नाहीत. हे प्रयोगाने सिद्ध झाले आहे.

**आंबा ३४३४ हेक्टर क्षेत्र**

जिल्ह्यात जास्त पाणी लागणाऱ्या उसाच्या शेतीला शेतकरी प्राधान्य देत आहेत. जास्त पाण्याने जमिनीचा कस कमी होत असल्याने शेतकरी आपोआप फळपिकाकडे वळू लागला आहे. जिल्ह्यात सर्वात जास्त डाळिंबाचे ४७ हजार ३७६ हेक्टर तर द्राक्षाचे १७ हजार हेक्टर क्षेत्र आहे. केळी, बोरे, सिताफळाचे क्षेत्रही विस्तारत आहे. जिल्ह्यात आतापर्यंत आंब्याचे क्षेत्र ३४३४ हेक्टरपर्यंत वाढले आहे.

**विविध जाती**

हापूसला जिल्ह्यात वातावरण नसल्याने कमी प्रमाणात याची लागवड झाली आहे. बाकी आंब्याच्या जातीला पोषक वातावरण असल्याने केशर, पायरी, तोतापुरी, रत्ना, सिंधू, मलिका, रायवळ जातीची लागवड वाढू लागली आहे. यातून एकरी तीन ते चार टन आंब्याचे उत्पादन मिळू लागले आहे.

**सातासमुद्रापार**

जिल्ह्यात आंब्याची लागवड वाढत असून उत्पादन होत आहे. उत्कृष्ठ आंब्याचे उत्पादन होत असल्याने युरोप आणि आखाती देशातून मागणी होत असल्याने सोलापूरचा आंबा सातासमुद्रापार पोहोचला आहे. मागील वर्षी युरोप, आखाती देशात आंब्याची सुमारे ३०० ते ३५० टन निर्यात झाली आहे.

**शासनाची मदत**

जिल्ह्यात सुमारे दोन हजार आंबा उत्पादक शेतकरी आहेत. त्यांना कृषी विभाग, कृषी तांत्रिक व्यवस्थापन संस्था (आत्मा) मार्गदर्शन करीत आहेत. विविध कार्यशाळा, चर्चासत्रे, परिषदा यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आंबा लागवड, कीड नियंत्रण, व्यवस्थापन, छाटणी, काढणी पश्चात तंत्रज्ञान, निर्यात, बाजारपेठ याविषयीची माहिती दिली जात आहे. राज्य शासन महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेतून फळबाग लागवडीसाठी मदत करीत आहे. आंबा उत्पादक शेतकऱ्यांनाही याची मदत करीत आहे. या योजनेच्या माध्यमातून हेक्टरी दोन लाख १९ हजार रूपयांचे अनुदान देण्यात येत आहे. आंबा फळाला १० ते १२ दिवसांनी पाणी द्यावे लागते. यामुळे आंबा बागेत १० वर्षांपर्यंत भाजीपाला, द्विदल, भूईमूग, पालेभाज्या, ताग ही आंतरपिके घेता येतात.

**कोरोना काळात व्हाटसॲप ग्रुपवरद्वारे मार्गदर्शन**

जिल्ह्यात आत्माचे प्रकल्प उपसंचालक मदन मुकणे यांनी दोन व्हॉटसॲप ग्रुप तयार केले आहेत. या ग्रुपमध्ये कृषी अधिकारी, निवडक कर्मचारी, शास्त्रज्ञ, आंबा उत्पादक शेतकरी, निर्यातदार आहेत. ग्रुपवर थेट शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळत आहे. कोरोना काळात शेतकऱ्यांना आंबा लागवडविषयी, तंत्रज्ञानची माहिती क्षणात मिळत होती. ग्रुपवरील तज्ज्ञ अनुभवी शेतकरी, शास्त्रज्ञ, अधिकारी मार्गदर्शन करतात. ग्रुपवर आंब्याचे मार्केटिंग प्रभावीपणे कसे करायचे याविषयी चर्चा घडवून आणली जाते. शेतकऱ्यांनी स्वतःहून १४ व्हॉटसॲप ग्रुप तयार केले आहेत. याद्वारेही ते एकमेकांना माहितीची देवाणघेवाण करीत आहेत.

**शेतकरी ते ग्राहक थेट विक्री**

व्हॉटसॲप ग्रुपच्या माध्यमातून आंबा उत्पादक शेतकरी खरेदीदारांशी जोडला गेला आहे. यामुळे ग्रुपवर फळाबाबत चर्चा, फोटोसेशन होत आहे. यातून शेतकरी ते ग्राहक थेट विक्रीची संधी प्राप्त झाली आहे. विक्रीसाठी प्रोत्साहन दिल्याने शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ होऊ लागली आहे.

**यंदा आंब्याचे क्षेत्र वाढणार- बाळासाहेब शिंदे**

मागील वर्षी भरपूर पाऊस झाला होता. यावर्षीही पाऊस चांगला झाला आहे. यामुळे यंदा आंबा लागवडीचे क्षेत्र वाढणार आहे. जिल्ह्यात केशर आंब्याची लागवड अतिघन पद्धतीने होत असून शेतकऱ्यांना एमआरईजीएस (महात्मा गांधी रोजगार हमी योजना) मधून मदत करण्यात येत आहे. जिल्ह्यात आंबा उत्पादनाला पोषक वातावरण, खडकाळ, पाण्याचा निचरा होणारी जमीन आहे. यामुळे शेतकऱ्यांचा कल आंबा लागवडीकडे वाढणार असल्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे यांनी सांगितले.

**आंबा उत्पादक संघाचे नियोजन- मदन मुकणे**

जिल्ह्यात डाळिंब, द्राक्षे या फळबागांचे संघ असल्यामुळे ते संघटित शेतकरी आहेत. मात्र आंबा, पेरू, ड्रॅगन फ्रुट यामधील शेतकरी संघटित नसल्यामुळे विक्रीवर परिणाम होतो. तालुका, जिल्हास्तरावर व्हॉटसॲप ग्रुपच्या माध्यमातून शेतकऱ्यांची चळवळ उभी राहत आहे. त्यांच्या कामाला संस्थात्मक स्वरूप देण्याच्या हेतूने तालुका, जिल्हास्तरावर आंबा उत्पादक व खरेदीदार संघ स्थापन करण्याचे नियोजन असल्याचे आत्माचे प्रकल्प उपसंचालक मदन मुकणे यांनी सांगितले.

# बालकांचे हक्क व संरक्षण अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करा : कुमार आशीर्वाद

**गडचिरोली / प्रतिनिधी**

बालकांना भयरहीत व सुरक्षित वातावरण मिळावे तसेच बालकांवर होणारे लैंगिक अत्याचार यावर प्रतिबंध घालण्याचे दृष्टिने बालहक्क व संरक्षण अधिनियम, बालमजूर, बालविवाह तसेच कर्तव्याच्या ठिकाणी महिलांवर होणारे लैंगिक अत्याचार या सर्व बाबीची जनजागृती करुन सदर संपूर्ण अधिनियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे दृष्टीने समग्र शिक्षा, महिला बाल व कल्याण विभाग, जिल्हा परिषद गडचिरोली, जिल्हा बाल संरक्षण कक्ष जिल्हा महिला व बाल विकास विभाग, गडचिरोली यांचे संयुक्त विद्यमाने तसेच मिरॅकल फाऊंडेशन, पुणे यांचे सहकार्याने तालुकास्तरीय संपूर्ण नियंत्रण अधिकारी तसेच संलग्न इतर यंत्रणेत काम करणारे प्रमुख अधिकारी व कर्मचारी यांची एक दिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळा जिल्हा नियोजन सभागृह, गडचिरोली येथे माधवी खोडे, अतिरिक्त विभागीय आयुक्त नागपूर विभाग, नागपूर यांचे आभासी पध्दतीने अध्यक्षस्थानी पार पडली. सदर कार्यशाळेचे प्रास्ताविक कुमार आशीर्वाद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले. प्रास्ताविकामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आजस्थितीत बालकांवर होणारे लैंगिक अत्याचार, बालमजूरी तसेच बालकांची होणारी शैक्षणिक गळती व कर्तव्याच्या ठिकाणी महिलांवर होणारे अत्याचार या संबंधी जनजागृती होऊन यावर प्रतिबंध घालण्यास शासनस्तरावरुन विविध अधिनियम निर्गमित केलेले असून त्या सर्वांची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टिने सदर कार्यशाळा आयोजित केलेली आहे. कार्यशाळेत उपस्थित संपूर्ण अधिकाऱ्यांनी तज्ञ मार्गदर्शकाकडून योग्यरितीने ज्ञान प्राप्त करुन मास्टर ट्रेनर म्हणून तालुकास्तरावर संपूर्ण यंत्रणेला अधिनियमाची जाणीव करुन देण्याकरीता प्रशिक्षणाचे आयोजन करावे असे निर्देशित केले. सदर कार्यशाळा ही वरिल संपूर्ण जनजागृतीची सुरुवात करण्याचे पहिले पाऊल असून यापूढे बालकांवरील होणारे लैंगिक अत्याचार व कर्तव्यावर असतांना महिलांवर होणारे अत्याचार यासंबधाने तालुकास्तरावर शाळेमध्ये मुलांना महिन्यातून एकदा व्यावहारिक ज्ञान व बालकांचे हक्क व संरक्षण याबाबत जनजागृती होण्यास व्याख्यान आयोजित करावयाचे आहे. तसेच तालुकास्तरावरील संपूर्ण कार्यालयामध्ये नियंत्रण अधिकारी यांच्या भेटीदरम्यान जनजागृती करावयाचे आहे. त्यामुळे सर्वांनी सदर कार्यशाळेत तज्ञ मार्गदर्शकाद्वारे देण्यात येणाऱ्या सुचनांची गांभीर्याने दखल घेऊन अधिनियमांची प्रभावी अंमलबजावणी करावे असे त्यांनी प्रतिपादन केले.





अध्यक्षस्थानावरुन बोलतांना अतिरिक्त विभागीय आयुक्त यांनी आदिवासी विकास विभागामध्ये अप्पर आयुक्त म्हणून कार्यरत असतांना गडचिरोली जिल्ह्यांतर्गत संपूर्ण आश्रमशाळांमध्ये बालकावरील होणारे लैंगिक अत्याचार, बालकांचे हक्क व संरक्षण याबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली. तसेच गुडटच व बॅडटच उपक्रम राबवून बालकांना लैंगिक अत्याचाराचे प्रतिबंध करण्यासंबधाने जाणीव करुन देण्यात आली. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी घरी गेल्यानंतर गावातील इतर बालकांना त्याबाबतची जाणीव करुन दिली. सर्व प्रशिक्षणार्थी यांनी कार्यशाळेला गांभीर्याने घेऊन प्रत्येकाद्वारे स्वतःचे मुलांची घेण्यात येणारी काळजी व त्याला स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत जशी शिकवण दिल्या जाते तशीच शिकवण प्रत्येकाने तालुक्यांतर्गत शाळांतील विद्यार्थ्यांना तसेच परिसरातील बालकांना द्यावे जेणेकरुन बालकांचे हक्क व संरक्षण अबाधित राहील. जेव्हा समाज सुरक्षित राहील तेव्हा आपण सुरक्षित राहणार. आदिवासी विभागाची अप्पर आयुक्त म्हणून कार्यरत असतांना गडचिरोली जिल्ह्यात राबविलेले उपक्रमास समोर नेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून जिल्ह्यातील कुमार व कुमारिका यांना जणू एक आशिर्वाद देत असल्याची भावना माधवी खोडे, विभागीय आयुक्त यांनी व्यक्त केली व यापुढे गडचिरोली जिल्ह्यासाठी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा संबधाने विभागीय कार्यालयाकडून प्राधान्यक्रमाने विचार करण्यात येईल व गडचिरोली जिल्ह्याला झुकते माप देण्यात येईल असे आश्वासन त्यांनी उपस्थितांना दिले.

सदर कार्यशाळेत बालकांचा जगण्याचा, सहभागीतेचा, सुरक्षेचा, विकासाचा, समतेचा अधिकार या पाच बाल अधिकाराबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. बालहक्क अधिनियमांबाबत डॉ.संदिप लांजेवार सदस्य बालकल्याण समिती गडचिरोली, बालमजूर संबधाने गजानन गोबाडे, जिल्हा बालसंरक्षण अधिकारी, गोंदिया, बालविवाह संबधाने उमेश मोरे समन्वयक, मिरॅकल फाऊंडेशन पुणे, बालकांची शैक्षणिक गळती व शैक्षणिक हानी याबाबत दिनानाथ वाघमारे संयोजक संघर्ष वाहीणी नागपूर, बालकांवरील लैंगिक अत्याचार व बालकांचे मानसिक स्वास्थ्यावर होणारे परिणाम याबाबत डॉ. सविता सादमवार, सदस्य बाल न्याय मंडळ गडचिरोली, कर्तव्याच्या ठिकाणी महिलांवर होणारे अत्याचार याबाबत डॉ. शुभदा देशमुख, आम्ही आमच्या आरोग्यासाठी गडचिरोली, बालकांचे हक्क व अधिकाराबाबत वर्षा मनवर, अध्यक्ष बालकल्याण समिती. तसेच कार्यशाळेचे उद्देश व निष्पत्ती याबाबत प्रिती डोईफोडे, प्रकल्प व्यवस्थापक, मिरॅकल फाउंडेशन पुणे यांनी तज्ञ मार्गदर्शक म्हणून सर्व उपस्थितांना मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेत प्रमुख अतिथी म्हणून शेखर शेलार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), ,जि.प. गडचिरोली, अर्चना इंगोले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जि.प. गडचिरोली, हेमलता परसा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), राजकुमार निकम, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जि.प. गडचिरोली, विवेक नाकाडे, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक), जि.प. गडचिरोली उपस्थित होते. तसेच प्रशिक्षणार्थी म्हणून तालुक्यातील सर्व गटविकास अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, केंद्रप्रमुख हे उपस्थितहोते. सदर कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडण्यास समग्र शिक्षा, जि.प. गडचिरोली अंतर्गत सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी उत्तम सहकार्य केले. कार्यशाळेचे संचालन अमरसिंग गेडाम, विस्तार अधिकारी (शिक्षण) व निकिता सरोदे, जिल्हा समन्वयक, व आभार प्रदर्शन अर्चना इंगोले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण), जि.प. गडचिरोली यांनी केले.

# जन आरोग्य योजनेतून विविध प्रमाणपत्रांचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वाटप





**गडचिरोली / प्रतिनिधी**

महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना ही २ जुलै २०१२ पासुन व आयुषमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना २३ सप्टेंबर २०१८ पासुन गडचिरोली जिल्हयात तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय, गडचिरोली कार्यान्वित आहे. आयुषमान भारत – प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे उद्दिष्टेपूती झाल्यामुळे २३ सप्टेंबर हा दिवस 'आयुष्यमान भारत दिवस' म्हणून साजरा करण्यासंदर्भात प्रधान सचिव सार्वजनिक आरोग्य विभाग मुंबई यांचे कडून सूचना प्राप्त झालेले होत्या. त्या अनुषंगाने दिनांक २३ सप्टेंबर २०२२ रोजी शुक्रवारला सकाळी ११.०० वाजता सदर कार्यक्रम पार पाडण्यात आला.

सदर कार्यक्रमास जिल्हाधिकारी संजय मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.अनिल रुडे, अति.जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतिशकुमार सोलंके, अति जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विनोद म्हशाखेत्री, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.सचिन हेमके, माता व बाल संगोपन अधिकारी डॉ.बेले तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.सुनिल मडावी, निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्यरूग्ण) डॉ.बागराज धुर्वे आदी अधिकारी तसेच जिल्हा सामान्य रुग्णालयातील व सदर योजनेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन अजय ठाकरे वरिष्ठ प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांनी केले. सदर कार्यक्रमामध्ये आयुषमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे २५ गोल्डन कार्ड, २० आभा कार्ड व १० अपंग प्रमाणपत्र वितरण जिल्हाधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

# आनंदवनातील निजबल अंतर्गत 'आंतरराष्ट्रीय कर्णबधिर सप्ताह' साजरा







**चंद्रपूर / प्रतिनिधी**

सप्टेंबर महिना हा कर्णबधिर व्यक्तींच्या जागरूकतेचा महिना म्हणून जगभरामध्ये ओळखला जातो. सप्टेंबर महिन्यामध्ये आंतरराष्ट्रीय कर्णबधिर सप्ताह, जागतिक कर्णबधिर दिन, जागतिक सांकेतिक भाषा दिन हे प्रामुख्याने जगभरातील कर्णबधिर समुदाय साजरा करतात.

यावर्षी १९ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर, २०२२ हा 'आंतरराष्ट्रीय कर्णबधिर सप्ताह' म्हणून साजरा होत आहे. तसेच दरवर्षी २३ सप्टेंबर रोजी 'आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिन' साजरा केला जातो.

जगभरातील कर्णबधिर समुदायाच्या जवळपास एकूण ३०० सांकेतिक भाषांपैकी एक असलेली 'भारतीय सांकेतिक भाषा' हि कर्णबधिर व्यक्तींची प्राथमिक भाषा आहे. हि एक नैसर्गिक दृश्य -मॅन्युअल भाषा असून ती कर्णबधिर आणि श्रवणक्षम दोन्ही समुदायां द्वारे वापरली जाते.

सांकेतिक भाषेत उपलब्ध दर्जेदार शिक्षणासह सांकेतिक भाषा आणि सेवा हे कर्णबधिर व्यक्तींच्या वाढ आणि विकासासाठी तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर विकास साध्य करण्यासाठी महत्वपूर्ण आहे. कर्णबधिरत्व हे दिव्यांगत्व असणे म्हणजे कमतरता नसून, त्याकडे भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेचा भाग म्हणून बघितले गेले पाहिजे.

संयुक्त राष्ट्र आणि वर्ल्ड फेडरेशन ऑफ द डेफ यांनी दिलेल्या 'सर्वांसाठी समावेशक समुदाय तयार करणे' या संकल्पनेवर आधारित आनंदवनातील 'निजबल' अंतर्गत 'संधिनिकेतन अपंगांची कर्मशाळा' येथे 'आंतरराष्ट्रीय कर्णबधिर सप्ताह' साजरा केला जात आहे. या उपक्रमा अंतर्गत कर्मशाळेतील कर्णबधिर विद्यार्थ्यांनी भारतीय सांकेतिक भाषेशी ओळख करून देणारा जागरूकता कार्यक्रम वरोरा शहरातील विविध माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालये येथे सादर केला. कार्यक्रमा अंतर्गत कर्णबधिर विद्यार्थ्यांनी श्रवणक्षम विद्यार्थी व उपस्थितांना त्यांच्या सांकेतिक भाषेचे धडे दिले तसेच त्यांच्यातील नृत्य व मूकनाट्य अभिनयाचे कौशल्य सादर केले. श्रवणक्षम विद्यार्थ्यांना सांकेतिक भाषा शिकवून त्याच भाषेतून त्यांच्याशी संवाद साधण्याचे कर्णबधिर विद्यार्थ्यांचे कौशल्य आणि आत्मविश्वास पाहून उपस्थित सर्व श्रवणक्षम विद्यार्थी कर्णबधिर विद्यार्थ्यांकडे नकळत आकर्षिले गेले आणि त्यांच्याशी जोडले गेले. श्रवणक्षम व्यक्तींशी मैत्री, सांकेतिक भाषेतून त्यांच्याशी थेट साधलेला संवाद आणि सर्वसामान्य मुख्य प्रवाहाने कर्णबधिरांची सांकेतिक भाषा शिकून घेण्यात दाखविलेली रुची, त्यांच्या दिशेने टाकलेले एक पाऊल हा सर्व अनुभव कर्णबधिर विद्यार्थ्यांना सर्वार्थाने संपन्न करणारा ठरला. या सप्ताहात एकूण १००० टक्के श्रवणक्षम व्यक्तींच्या समुदायापर्यंत हा जागरूकता कार्यक्रम घेऊन हे कर्णबधिर विद्यार्थी पोहोचले.

२३ सप्टेंबर, जागतिक सांकेतिक भाषा दिनी डब्ल्यूएफडी यांनी सुचविलेल्या 'सांकेतिक भाषा आम्हाला एकत्र करतात. या धर्तीवर आधारित निजबल येथे कर्णबधिर विद्यार्थ्यांकरिता विविध खेळ व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विशेष बाब म्हणजे हे सर्व खेळ व स्पर्धा 'भारतीय सांकेतिक भाषा' याच विषयाला अधोरेखित करणारे होते. कर्णबधिरांच्या बोलक्या जगातील सळसळता उत्साह आणि भाषिक विविधतेने नटलेल्या या दिवशी उपस्थित सर्व शिक्षक आणि कर्णबधिर विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेतला. श्रद्धेय बाबा आणि साधना ताई आमटे यांना अभिप्रेत असणारे 'निजबल' हे सर्वांसाठी समावेशक समुदाय तयार करण्याच्या दिशेने आपली वाटचाल करीत आहे. गेली ५ दशके संधिनिकेतन अपंगांची कर्मशाळा हि दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणा वर काम करते आहे. आंतरराष्ट्रीय कर्णबधिर सप्ताहाचे औचित्य साधत अश्विनी आंधळकर यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा उपक्रम महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे, संस्थेचे कार्यकारी विश्वस्त कौस्तुभ आमटे, पल्लवी आमटे आणि संधिनिकेतन अपंगांची कर्मशाळा येथील व्यवस्थापकीय अधीक्षक रवींद्र नलगिंटवार यांच्या मार्गदर्शनात सर्वत्र राबविण्यात आला. कर्मशाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचे या उपक्रमाला अमूल्य योगदान लाभले.

# महाकाली महोत्सवात सराफा असोशिएशन देणार ८ किलो वजनाची माता महाकाली मातेची चांदीची मुर्ती

## महाकाली महोत्सवाची दुसरी नियोजन बैठक



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

नवरात्रोत्सवात माता महाकाली महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यात चंद्रपूरातील दान दात्यांनी समोर येण्याचे आवाहण आमदार किशोर जोरगेवार यांनी केले होते. त्यांच्या आवाहणा नंतर सराफा असोशिएशनने महोत्सवाकरिता आठ किलो वजनाची माता महाकाली ची मुर्ती देण्याची घोषणा केली आहे.

माता महाकाली मोहत्सवाच्या नियोजनाच्या दुस-या बैठीचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते. सदर बैठकीत सराफा असोशिएशने ही घोषणा केली आहे. याबाबत आमदार किशोर जोरगेवार यांनी माता महाकाली भक्तांच्या वतीने सराफा असोशिएशनचे आभार मानले आहे.

यासाठी सराफा असोशिएशनचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र लोढा, जिल्हा उपाध्यक्ष ओमप्रकाश सोनी, जिल्हा सचिव आशु सांगोळे, जिल्हा संपर्क सचिव भिमराज कुकरा, जिल्हा कोषाध्यक्ष मितेश लोढिया, शहर असोशिएशन अध्यक्ष भारत शिंदे, कोषाध्यक्ष प्रवीण जुमडे, सहसचिव राकेश ठकरे, सल्लागार समिती सदस्य राजेंद्र लोढा, सत्यम सोनी, कार्यकारी सदस्य प्रमोद लुनावत, संजय सराफ, मितेश लोढिया, भिवराज सोनी, विजय चांडक, विनय जैन यांच्यासह असोशिएशनच्या इतर सदस्यांनी सहकार्य केले आहे.

याबाबात महाकाली मंदिराच्या सभागृहात महाकाली महोत्सव नियोजनाची शुक्रवारी दुसरी बैठक संपन्न झाली. या बैठकीत सराफा असोशिएशनने माता महाकालीची ८ किलो चांदीची मुर्ती देण्याची घोषणा केली आहे. माता महाकाली महोत्सवा दरम्याण माता महाकाली पालखी नगर प्रदक्षिणा करण्यात येणार आहे. सदर पालखी यात्रेत ही चांदीची मुर्ती ठेवण्यात येणार आहे. सोबतच नवरात्रो दरम्याण सदर मुर्ती पुजा करण्यासाठी शहरातील मंदिरांमध्येही ही उपलब्ध करून दिल्या जाणार आहे.

यावेळी सायंकाळी सात वाजता माता महाकालीच्या महिला भक्तांची बैठक संपन्न झाली यावेळी भारती दुधानी, डॉ. आसावरी देवतळे, अनुराधा जोशी, वंदना हातगावकर, सपना पॉल, हेमांगी बिस्वास, ॲड. इतिका शहा, स्मिता चावडा, कोकीळा पोटदुखे, रचना वनकर, सविता कोट्टी, स्नेहा मेश्राम, शितल लोहिया, एकता पित्तुलवार, सविता दंडारे, मंजु रज्जाक, मृणालीनी खाडीकर, मनिषा पडगेलवार, सरोज चांदेकर, अल्का चांडक, चंदा जिवतोडे, आशा देशमुख यांच्यासह माता महाकाली महिला भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. तर सायंकाळी आठ वाजता पुरुष भक्तांची बैठक संपन्न झाली.

आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतुन चंद्रपूरात पहिल्यांदाच सुरु होत असलेल्या माता महाकाली महोत्सवाला महाकाली भक्तांचा मोठा सहभाग लाभत आहे. सदर महोत्सवात लोकसहभाग असावा या हेतुन नियोजन केल्या जात आहे. सलग चार दिवस सदर महोत्सव चालविण्याच्या दिशेने महाकाली महोत्सव समितीचे नियोजन सुरु आहे. चार दिवस शहरात भक्तीमय वातावरण राहणार असुन हा महोत्सव राज्यभरात प्रसिध्द करण्याच्या दिशेने महाकाली भक्तांच्या वतीने प्रयत्न सुरु आहे.

# सदाशिव ताजनेचे कार्य धडधाकट माणसाला पण लाजविणारे : डॉ. विकास आमटे



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

सदाशिव ताजने यांचे कार्य धडधाकट माणसाला पण लाजविणारे आहे, त्यांचे आनंदवनातील पदार्पण आणि माझी कार्याची सुरुवात १९७१ पासून सुरू झाली, स्वरानंदवनच्या माध्यमातून आजपर्यंत अनेक कार्यक्रम महाराष्ट्र भर त्याने केलेली आहेत. ताजनेकडून प्रत्येकांनी प्रेरणा घेतली पाहिजे असे प्रतिपादन आनंदवनाचे सचिव डॉ. विकास आमटे यांनी केले, औचित्य होते . आनंदवनातील विश्वस्त तथा स्वरानंदवनचे मुख्य व्यवस्थापक सदाशिव ताजने यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. गोविंद कासट लिखित 'बाबा आमटे यांच्या आनंदवनातील सदाशिव ताजने' या पुस्तकाचे १३ व्या आवृत्तीचे प्रकाशन डॉ. विकास आमटे यांचे हस्ते त्यांच्या निवासस्थानी पार पडले.

या कार्यक्रमाला उपस्थित प्रमुख पाहुणे माजी राज्यपाल रा. सु. गवई यांच्या पत्नी श्रीमती कमलताई गवई, डॉ. भारती आमटे, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. गोविंद कासट, प्राचार्य सुभाष गवई ,माजी नगरसेवक प्रभाताई आवारे, उमा कासट, आनंदवनाचे आरोग्य अधिकारी डॉ विजय पोळ, विश्वस्त सुधाकर कडू ,माधव कवीश्वर, ज्येष्ठ नागरिक संघाचे सोनेकर, पराते, अशोक मगरे आदी उपस्थित होते.

यापप्रसंगी ताजने यांचा डॉ. विकास आमटे व लेडीगव्हर्नर कमलताई गवई यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. गोविंद कासट आपल्या भाषणात म्हणाले ,डॉ. विकास आमटे यांच्या यावर्षी अमृत महोत्सवानिमित्त अमरावतीकरांसाठी १२ महिन्याच्या भेटीचे आयोजन करण्यात आलेले असून ही ११ व्या महिन्याची भेट आहे, येणा?या २७ ऑक्टोबरमध्ये शेवटची १२ महिन्याची भेट असून या १२ भेटीवर डॉ. विकास आमटे यांचा अमृत महोत्सव म्हणून पुस्तक प्रकाशन करण्याचे ठरविलेले आहे, हे सर्व घडवून आणण्यासाठी आम्हाला सदाशिव ताजने हे महत्वाचे दुवा म्हणून काम करतात, याशब्दात त्यांनी गौरवाउद्गार काढलेले होते.

कार्यक्रमानंतर स्वरानंदवन मध्ये पाहुण्यांना संगीत कार्यक्रम सुद्धा दाखवीण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गोविंद कासट यांनी केले तर आभार प्रदर्शन राजेश ताजने यांनी मानले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अभिवादन सोहळा




**वर्धा / प्रतिनिधी**

१४ सप्टेंबरला राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकशाहीर स्व. अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचे लोकार्पण रशियाची राजधानी मास्को येथे करण्यात आले.याचे औचित्य साधून १७ सप्टेंबरला सिंदी मेघे वस्तीमध्ये हनुमान मंदिर परिसरात कार्यक्रम राबविण्यात आला, व कार्यक्रमाच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचे व कर्तुत्वाचे वर्णन करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून प्रमोद खंडारे,पंकज खंगार सामाजिक कार्यकर्ते ,सुधाकर शंभरकर, स्थानिक गावकरी कार्यक्रमांमध्ये वॉर्डातील मंडळी तसेच अनुलोमचे वस्ती स्थान मित्र उपस्थित होते.

कार्यक्रमांमध्ये अण्णाभाऊ साठे यांचे जयघोष करुण,त्यांचे कर्तुत्व, विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्व मान्यवरांनी आपल्या संभाषणातून मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अनुलोम चे वर्धा भाग जनसेवक लोकेश गांडोळे यांनी केले..

## तोरगाव येथील युवकाची गळफास लावून आत्महत्या

**चंद्रपूर / प्रतिनिधी**

ब्रह्मपुरी तालुक्यातील तोरगाव बुजुक येथील पंचवीस वर्षीय युवकाने झाडाला गळफास लावून जीवन यात्रा संपविल्याची घटना २४ सप्टेंबर शुक्रवारला सकाळच्या सुमारास उघडकीस आली. संदीप रामटेके असे युवकाचे नाव आहे. तोरगाव गावाजवळील चीचबोर्डीच्या पारीवर असलेल्या आंब्याच्या झाडाला संदीप रामटेके हा युवक गळफास लागलेल्या अवस्थेत नागरिकांना दिसून आला या घटनेची माहिती गावात पसरतात नागरिकांनी घटनास्थळाकडे धाव घेतली.

# अक्षय थुटे यांचा सहकाऱ्यांसह भाजपात प्रवेश



**वर्धा / जिल्हा कार्यालय**

देशाचे यशस्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी भारतीय जनता युवा मोर्चा प्रदेश सचिव अंकुश ठाकूर यांच्या नेतृत्वात व आमदार समीर कुणावार, किशोर दिघे यांच्या हस्ते सामाजिक कार्यकर्ते अक्षय भास्कर थुटे यांनी सहकाऱ्यांसह भाजपात प्रवेश केला.

अक्षय थुटे हे मागील अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. ते वीर भगतसिंग विद्यार्थी परिषदेचे विधानसभा अध्यक्ष होते. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसह इतर सामाजिक कार्यात देखील ते सक्रिय आहेत. कोविड-१९ च्या काळात रुग्णांना थेट रुग्णालयात जाऊन रक्तदान, आत्महत्याग्रस्त कुटुंबातील विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके, गणवेश वाटप यांसारख्या अनेक कार्यातून त्यांनी हिंगणघाट शहरासह ग्रामीण भागात सुद्धा आपली पकड मजबूत केली. युवा सुशिक्षित ,शांत, संयमी स्वभाव असल्याने सगळ्याच राजकीय पक्षात त्यांचे हितचिंतक आहे, याचाच फायदा आगामी काळात भारतीय जनता युवा मोर्चाचे संघटन अधिक मजबूत करण्यात होईल .

अक्षय थुटे यांच्यासह अमर मेसरे, सचिन महाजन, तुषार मांडवकर, शुभम मांडवकर, अनुप भंडारे, पियुष डांगे, हर्षल जिकार, साहिल उमाटे, अंकित कोल्हे, ऋषीकेश उमाटे आदिनी पक्ष प्रवेश केला. यां प्रसंगी हिंगणघाट विधानसभा क्षेत्रातील भाजपा तसेच भाजयुमो चे सर्व पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# अंत्योद्यापासून सर्वोदयापर्यंत' या मुलतत्वावरचं 'सबका साथ, सबका विकास और सबका विश्वास' चे तत्व आधारभूत आहे : जिल्हाध्यक्ष भोंगळे



## घुग्घुस येथील ना. सुधीर मुनगंटीवार सेवा केंद्रात पं. दिनदयाळ उपाध्याय जयंती साजरी

**घुग्गुस / प्रतिनिधी**

येथील ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात अंत्योदयाचे प्रणेते, महान तत्त्वचिंतक पं. दिनदयाळ उपाध्याय जी यांच्या १०६ व्या जयंतीदिनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना भाजपा जिल्हाध्यक्ष देवराव भोंगळे म्हणाले, पं. दीनदयाळजींना अंत्योदयाचे प्रणेते मानले जाते. त्यांनी जगासमोर एकात्म मानववादाचा सिद्धांत मांडला. समाजातील शेवटच्या घटकाच्या जिवनात आनंद निर्माण झाला पाहिजे आणि दुर्लक्षित घटक समाजाच्या प्रगत प्रवाहात आला पाहिजे यासाठी त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत अविरत कार्य केले. पंडितजींचा अंत्योदयाचा विचार पुढे घेऊन जाण्यासाठी देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने नानाविध योजना व कार्यक्रम हाती घेतले आहेत. 'अंत्योदयापासून सर्वोदयापर्यंत' या मुलतत्वावरचं 'सबका साथ, सबका विकास और सबका विश्वास' चे तत्व आधारभूत आहे. सर्वार्थाने दरीद्री नारायणाचे कल्याण व्हावे आणि देश उन्नतीच्या दिशेने मार्गस्थ व्हावा यासाठी मोदी सरकारने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना, आवास योजना, उज्ज्वला गॅस, जन-धन खाते इ. अशा एक ना ऐक योजनांच्या माध्यमातून अंत्योदयाच्या कल्याणासाठी मोदी सरकार प्रयत्नरत आहे.

पुढे बोलताना, आज पंडितजींच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात ठिकठिकाणी विविध सेवा कार्यक्रमांचे आणि मा. पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या मन की बात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. असेही त्यांनी सांगितले.

यावेळी भाजयुमोचे प्रदेश उपाध्यक्ष विवेक बोढे, गो. वि. सिनेट सदस्य यश बांगडे, निरीक्षण तांड्रा, अमोल थेरे, बबलू सातपुते, नितीन काळे, भानेश शेट्टी, असगर खान, मधुकर धांडे, वसंता भोंगळे, सुशील डांगे, गणेश बोबडे, दिनेश बांगडे, महेश मुक्के, सुनील ब्रह्मे, श्रीकांत आगदारी, बबन मेश्राम, अविनाश कोराम, अमित चिंचोलकर, पराग धांडे, परमानंद निचकोला, मूर्ती पेरपुल्ला, दादू धांडे, आशिष दातारकर, राहुल बोबडे, विल्सन आंबट सोबत उपस्थित होते.

## अज्ञात चोरट्यांनी नकली दागिने देऊन अडीच लाख रूपये केले लपास.

**चंद्रपूर** : नागभीड पोलिस स्टेशन अंतर्गत कान्पा बाजारातून सापळा रचून उमरेड शहरात बोलावून अज्ञात चोरट्यांनी नकली दागिने एका दांम्पत्याला देऊन त्या बदल्यात अडीच लाख रूपये घेऊन फरार झाल्याच्या घटनेचा नागभीड पोलिस स्टेशन मध्ये अज्ञात आरोपी विरूद्ध गुन्हा दाखल झाला .

भावना प्रविण अलमस्त वय २६ वर्ष रा. नवखळा ता. नागभीड असे तक्रारदार महिलेचे नाव असून हे दोघे पती पत्नी परिसरातील बाजार जाऊन पालेभाज्या व कठाण माल विकतात . दरम्यान काही दिवस आधी कान्पा बाजारात पालेभाज्या व कठाण माल विक्री चा दुकान मांडला असता. तेव्हा दोन इसम येऊन यांच्या दुकानातून टमाटर घेतले व तिच्या पती जवळ बसले व चर्चा करू लागले , चर्चाअंति त्यांनी दांम्पत्यांना चांदीचे नाणे दाखविले व आम्हाला असा चांदीचा व सोन्याचा माल भरपूर मिळाला आहे. असे सांगून यांच्या कडून फोन नंबर घेतला. दरम्यान त्यांनी फोनवर संपर्क सुरू केला, आणि एक दिवस ते दोन्ही व्यक्ती या दांम्पत्याच्या घरी आले व सोन्याच्या मनीचा हार दाखवून हा हार विकायचा आहे व तुमच्या खात्री साठी या हार मधील एक मनी काढून तुम्ही खात्री करा असे बोलले.

# प्रशासकीय सेवा महाविद्यालयात रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

भद्रावती शिक्षण संस्था भद्रावती द्वारा संचालित कै. निळकंठराव शिंदे प्रशासकीय सेवा महाविद्यालय वरोरा येथे रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबीर आयोजित करण्यात आले होते . या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून रमेशराव राजूरकर उद्योगपती व समाजसेवक वरोरा हे उपस्थितीत होते.

रोजगार व स्वयंरोजगार कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना विद्यार्थ्यांनी सरकारी सेवेच्या मागे न लागता आपण उद्योगपती होउन इतरांना नौकरी देणारे व्हावे असे मार्गदर्शन केले. प्राचार्य पियुष लांडगे यांच्या हस्ते पाहूण्यांचा सत्कार करण्यात आला.

पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक डॉ. प्रशांत पाठक यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसी खोंडे हिने केले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे संचालक डॉ. कार्तिक शिंदे यांच्या प्रेरणेने घेण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता प्रा. गुरुदेव जुमडे, प्रा. सीमा बोभाटे, प्रा. प्रणाली नरड, प्रा. प्रमोद पाठक, शकिल शेख, यांनी अथक परिश्रम घेतले.

# केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्री यांचा महिला काँग्रेसने केला निषेध



**चंद्रपूर / प्रतिनिधी**

केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्री हरदीप सिंग पुरी हे चंद्रपूर च्या तीन दिवसीय दौऱ्यावर आहेत. केंद्र सरकारने सतत पेट्रोल, डिझेल, गॅस यात दरवाढ केल्या मूळे सामान्य लोकांचे महागाई मुळे जगणे कठीण झाले आहे. याला पूर्णपणे केंद्र सरकार जबाबदार आहे असा आरोप करत चंद्रपूर महिला काँग्रेस ग्रामीण कडून हरदीप सिंग पुरी यांचा त्यांच्या मार्गावर ठिय्या निषेध करण्यात आला.

चंद्रपूर लोकसभेची जबाबदारी केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांच्या कडे सोपविण्यात आली आहे. या दौऱ्यात ते कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करून भेटी गाठी घेणार आहेत. याचाच निषेध करण्यासाठी चंद्रपूर जिल्हा महिला काँग्रेस ग्रामीण च्या अध्यक्षा नम्रता आचार्य ठेमस्कर यांच्या नेतृवात महिला काँग्रेस तर्फे निदर्शने करण्यात आले.

पुरी हे पेट्रोलियम मंत्री आहेत पण पेट्रोल, डिझेल चे दर कमी राहावे म्हणून त्यांनी काहीही प्रयत्न केले नाही उलट भाजपला फक्त निवडणूक दिसते. गोरगरीब जनता दिसत नाही, भाजपा हे एक इलेक्शन मशीन आहे. आता सुद्धा लोकसभा निवडणुक डोळ्या समोर ठेऊन पुरी चंद्रपूरात आले आहेत यांना कार्यकर्त्यांशी संवाद साधता येतो पण सामान्य लोकांशी नाही. असा आरोप यावेळी नम्रता ठेमस्कर यांनी केला. यावेळी उपस्थित महिलांनी महागाई विरोधात घोषणा दिल्या. तसेच फलक हातात घेऊन पुरी यांचा निषेध केला. हरदिप पुरी गो बॅक, हरदीप पुरी वापस जाओ, मेहंगाई कम करो वरना कुर्सी खाली करो अशा घोषणा दिल्या.

या वेळी चंद्रपूर जिल्हा महिला काँग्रेस च्या अध्यक्ष नम्रता आचार्य ठेमस्कर, जिल्हा उपाध्यक्षा सुनीता धोटे, सेवा फाउंडेशन च्या शहर अध्यक्ष शितल कातकर, सेवादल महिला काँग्रेस च्या शहर अध्यक्षा लता बारापात्रे, अनुसूचित विभाग महिला काँग्रेस च्या शहर अध्यक्ष शालिनी भगत, सीमा धुर्वे, मंगला शिवरकर, किरण वानखेडे, मीनाक्षी गुजरकर, मेहेक सय्यद, मुन्ना तावाडे, प्रतीक दुर्योधन, मोबिन सय्यद यांची उपस्थिती होती.

# लम्पी आजाराचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी काळजी घ्या !

## पशुधन विकास अधिकारी डॉ. किरण जाधव यांचे आवाहन



**कोरची / प्रतिनिधी**

राज्याच्या पशुसंवर्धन विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यातील विविध जिल्ह्यात पशु धनामध्ये लम्पी आजाराची बाधा झाल्याचे निष्पन्न झाले आहे. या रोगाला घाबरून न जाता पशुपालकांनी सतर्क राहून रोगाचा प्रादुर्भाव होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन मसेली येथील अतिरिक्त पशुधन विकास अधिकारी डॉ. किरण एस जाधव यांनी केले आहे.

कोरची तालुक्यातील मसेली पशुवैद्यकीय दवाखाना अंतर्गत बोदालदंड येथे २३ सप्टेंबरला लम्पी आजाराबाबत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले. येथील नागरिकांच्या जनावरांच्या गोठ्यावर जाऊन गोठा साफसफाई व औषधपचार फवारणीची प्रात्यक्षिके करण्यात आली. तसेच गावातील ६० जणांचा गाय-बैलांचा गोठ्यात औषधी फवारणी सुद्धा करण्यात आली आहे. सध्या कोरची तालुक्यात लम्पी आजाराचे एकही गाय, बैल नाही परंतु पूर्व काळजी घेण्याची गरज असल्याने गोठ्यात फवारणी व स्वच्छता ठेवणेबाबद पशुविभागाकडून जनजागृती करणे सुरू आहे.

लम्पी हा रोग गाय, बैल यांच्यात जास्त प्रमाणात आढळतो. अंगावर गाठी येणे पायावर व पोळीवर सूज येणे, डोळ्यातून व नाकातून स्राव वाहने, दुग्ध उत्पादनात घट होणे, आदी या रोगाची लक्षणे आहेत. आजारी जनावरे निरोगी जनावरांपासून दूर बांधावे, गोठा स्वच्छ करून कडूलिंबाच्या पानाचा धूर करावा, जनावरांच्या अंगावरील कीटक व गोमाशा गोचीड चिलटे इत्यादींच्या नियंत्रणासाठी एक लिटर पाण्यात ४० मिली करंजी तेल, ४० मिली नीम तेल आणि ४० ग्राम साबण याचे एकत्रित मिश्रण करून जनावरांच्या अंगावर तसेच गोठ्यात फवारणी करावी. अशा विविध घरगुती उपाय योजनांचा सल्लाही डॉ. किरण जाधव यांनी पशुपालकांना दिला आहे. जनावरे आजारी असल्याचे लक्षात आल्यास तात्काळ पशुवैद्यकीय दवाखान्यात घेऊन यावे वेळीच उपचार झाल्यास हा रोग बरा होण्यास मदत होते असे आवाहन डॉ. जाधव यांनी जनजागृती कार्यक्रमातून केला आहे.

# सह्याद्रीचा राखणदारच्या वर्धा जिल्हा कार्यालयाचे थाटात उद्घाटन








**वर्धा / प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील अग्रगण्य साप्ताहिक सह्याद्रीचा राखणदार च्या वर्धा जिल्हा कार्यालयाचे १६ सप्टेंबरला विविध मान्यवरांच्या उपस्थित उदघाटन संपन्न झाले .

चंद्रपूर जिल्ह्यातील लोकप्रिय दर्जेदार वृत्तपत्र म्हणून ओळख निर्माण केलेल्या साप्ताहिक सह्याद्रीचा राखणदारचे कार्यक्षेत्र विस्तार सुरु आहे . याची सुरवात वर्धा जिल्हा आवृत्ती सुरु करून केल्या गेली . साप्ताहिकाच्या वर्धा जिल्हा कार्यालयाचे उदघाटन १६ सप्टेंबरला पंडित दीनदयाल उपाध्याय फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते गिरीश अग्निहोत्री यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सह्याद्रीचा राखणदारचे संस्थापक संपादक मारोती नारायण घुमे होते. प्रमुख अतिथी म्हणून सी. डी. सी बँकेचे माजी संचालक तथा जिल्हा सहकार बोर्ड चंद्रपूरचे उपाध्यक्ष वसंत विधाते , प्रहारचे रुग्णमित्र गजू कुबडे , अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विदर्भ प्रांत माजी अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते अतुल शेंडे , सह्याद्रीचा राखणदारचे व्यवस्थापकीय संचालक आशिष घुमे , कार्यकारी संपादक सुरज घुमे, वर्धा जिल्हा आवृत्तीचे संपादक प्रशांत अवचट , सहसंपादक राहुल मुन मंचावर उपस्थित होते . छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली . यावेळी सह्याद्रीचा राखणदार चे व्यवस्थापकीय संचालक आशिष घुमे यांनी, आपल्या प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश व सह्याद्रीचा राखणदारच्या पाच वर्षाचा प्रवास सांगितला . यावेळी उपस्थित मान्यवरांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. मान्यवरच्या हस्ते लालफीत कापून कार्यालयाचे उदघाटन करण्यात आले . त्यानंतर अंकाचे विमोचन करण्यात आले. उदघाटनीय भाषणात गिरीश अग्निहोत्री यांनी, सह्याद्रीचा राखणदार हे वृत्तपत्र जनसामान्य, वंचित, शेतकरी, शेतमजुरांचे राखणदार व्हावे असे मत व्यक्त करीत पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या .अध्यक्षीय भाषणात संस्थापक मारोती घुमे यांनी वृत्तपत्राच्या सुरूवातीपासून ते आता पावेतो झालेला सर्व प्रवास कथन करीत सह्याद्रीचा राखणदार भविष्यात महाराष्ट्रातील संपूर्ण जिल्ह्यात जिल्हा आवृत्ती सुरु करणार असल्याची घोषणाही केली. वर्धा येथील चमूला त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या . उदघाटनीय कार्यक्रमानंतर उपस्थित प्रतिनिधींची कार्यशाळा घेण्यात आली . या दोन्ही कार्यक्रमाचे संचालन सिद्धांत ढोके, आभारप्रदर्शन सहसंपादक राहुल मुन यांनी मानले. यावेळी वर्धा जिल्ह्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

## विविध मान्यवरांची उपस्थिती



# राज्यातील पूरग्रस्त, अतिवृष्टीग्रस्त व नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी एकरी मदत व अनुदान द्या : रवि शिंदे

**भद्रावती / प्रतिनिधी**

राज्यातील पूरग्रस्त व अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना १५ सप्टेंबरपासून बँक खात्यात थेट मदत देण्याची घोषणा राज्य सरकारने विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात केली होती. मात्र, घोषणा करून २४ दिवसाचा कालावधी लोटला असतांना एकाही शेतकऱ्यांच्या खात्यात मदत जमा झाली नाही. सोबतच नियमित कर्जफेड करणारे शेतकरीही प्रोत्साहन अनुदानापासून वंचित आहेत. त्यामुळे राज्यातील पूरग्रस्त, अतिवृष्टीग्रस्त व नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी ज्याप्रमाणे एकरी पीककर्ज वाटप होते त्याचप्रमाणे एकरी नुकसान मदत व अनुदान द्यावे, अशी मागणी स्व. श्रीनिवास शिंदे मेमोरिअल रवि शिंदे चॅरीटेबल ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष रवि शिंदे यांनी केली आहे.

विशेष म्हणजे याबाबतची मागणी यापूर्वीच रवि शिंदे यांनी राज्य शासनाकडे केलेली होती व अतीवृष्टी प्रभावित शेतकऱ्यांच्या बैठकी घेवून जिल्हाधिकारी मार्फत शासनाला वरोरा व भद्रावती तालुक्यातील अनेक ग्रामपंचायतीचे ठराव पाठविले होते. स्व. श्रीनिवास शिंदे मेमोरिअल रवि शिंदे चॅरीटेबल ट्रस्टद्वारा एकरी मदत देण्याबाबत अनेक निवेदने राज्य शासनाला पाठविली आहे, मात्र राज्य शासनाने दखल घेतलेली नाही.

राज्यात जुलै व ऑगस्ट महिण्यांत झालेल्या मुसळधार पाऊसामुळे राज्यात पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. संततधार पाऊसामुळे अतिवृष्टी होवून शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचून शेतमालाचे मोठे नुकसान झाले. तसेच पूर व अतिवृष्टी झाल्याने रब्बी हंगामातील पिके पूर्णतः नष्ट झाली. अनेक शेतकऱ्यांनी दुबार व तिबार पेरणी केली मात्र, सतत तीन वेळा आलेल्या अतिवृष्टीने होत्याचे नव्हते केले. दरम्यान राज्य शासनाने अतिवृष्टी व पूरग्रस्त शेतकऱ्यांना एनडीआरफच्या निकषाच्या दुप्पट मदत व दोन ऐवजी तीन हेक्टर पर्यंत मदत देण्याचा निणर्य घेतला. त्यानंतर पावसाळी अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घोषणा करून १५ सप्टेंबरपासून नियमित कर्जफेड करणारे शेतकरीही प्रोत्साहन अनुदानापासून वंचित आहेत. बँक खात्यात थेट मदत देण्याची घोषणा केली. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेमुळे शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वीच मदत मिळण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिवेशनात घोषणा करून २४ दिवसाचा कालावधी लोटला आहे. मात्र, राज्यातील एकाही शेतकऱ्यांच्या खात्यात एक दमडी जमा झाली नाही. राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना गाजर दाखवून तोंडाला पाने पुसली जात आहे.

शेतकऱ्यांची नगदी पिके पुर व अतिवृष्टीमुळे नाहिसे झाले असतांना शासनाकडून शेतकऱ्यांना त्वरीत मदतीची अपेक्षा होती. मात्र, सरकारने स्वतःच केलेल्या घोषणेचा विसर पडला आहे. सरकारच्या घोषणाबाजीमुळे शेतकरी प्रचंड संतापला आहे. नियमित कर्जफेड करणारे शेतकरीही प्रोत्साहन अनुदानापासून वंचित आहेत. नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार प्रोत्साहन अनुदान देण्याची घोषणा शासनाने केली आहे. या योजनेचा लाभ राज्यातील १३ लाख ८५ हजार शेतकऱ्यांना होणार असून ५ हजार ७२२ कोटीचा खर्च अपेक्षित आहे. शासनाने जिल्हावार नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या याद्या मागविल्या आहेत. मात्र, शेतकऱ्यांना प्रत्यक्ष अनुदानाचा लाभ कधी मिळेल याबाबत शासनाकडून स्पष्टीकरण देण्यात आले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रोत्साहन योजनेचा लाभ तथा ज्याप्रमाणे एकरी पीककर्ज वाटप होते त्याचप्रमाणे अतिवृष्टी व पूरग्रस्त शेतकऱ्यांना एकरी नुकसान मदत व अनुदान दिवाळीपूर्वी दयावी, अशी मागणी रवि शिंदे यांनी केलेली आहे.

# समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांकडून वृक्षारोपण

**वर्धा / प्रतिनिधी**

न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज वर्धा येथील समाजकार्य विभागातील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांकडून क्षेत्रकार्या अंतर्गत समाजकार्य विभागाचे प्रा. डॉ. निशांत चिकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक नालवाडी ग्रामपंचायत अंतर्गत येत असलेल्या नागसेन नगर परिसरात वृक्षारोपण करुण झाडांचे महत्व विद्यार्थ्यांना व परिसरातील नागरिकांना समजावून सांगण्यात आले.

यावेळी समाजकार्य विभागाचे विभागप्रमुख प्रा. संदीप गिरडे व आंगनवाड़ी सेविका जयतुला थूल




यांची प्रमुख उपस्थिति होती. झाडे लावणे व झाडांचे संवर्धन करने ही काळाची गरज असून प्रत्येक माणसाला जीवंत राहण्यासाठी ऑक्सीजनची गरज असते आणि ते झाडांपासुनच मिळते. म्हणून प्रत्येकांनी आपली नैतिक जबाबदारी समजून झाडे लावने काळाची गरज आहे असे प्रतिपादन विभागाचे प्रा. डॉ. निशांत चिकाटे यांनी केले. यावेळी कार्यक्रमाला प्रामुख्याने उपस्थित असलेले समाजकार्य विभागाचे विभागप्रमुख प्रा. संदिप गिरडे यांनी झाडांपासून आपल्याला ऑक्सीजनच मिळत नाही तर शुद्ध हवा, फळे, फुले व सावली सुद्धा मिळते त्यामुळे झाडे लावून त्याची प्रत्येकांनी निगा राखावी असे मत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समाजकार्य विभागाची विद्यार्थिनी शिल्पा लोखंडे, सूत्रसंचालन स्वाती कडू तर आभारप्रदर्शन सागर मरसकोल्हे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समाजकार्य विभागाच्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले. यावेळी परिसरातील नागरिकांनी भरभरुन प्रतिसाद दिला.

# गोडरी मधून उगम झालेली शिवनाथ नदी आमचीच जीवनदायी आहे : आ. इंदलसाय मडावी

## गोडरी मधून उगम झालेल्या शिवनाथ नदी उगमस्थान छत्तीसगड प्रशासने केली महाआरती



**कोरची / प्रतिनिधी**

झाडाला फळे लागतात पण झाड कधी फळ खात नाही ती फळ इतरांच्या उपयोगी पडत असतात असेच काही कोरची तालुक्यातील गोडरी गावातून उगम झालेल्या शिवनाथ नदीमुळे छत्तीसगड राज्याची जीवनदायी ठरलेली नदी कोरची तालुक्यातील लोकांना उपयोगाचे नसले तरी आम्हाला ती जीवनदायी आहे असे उद्गार आमदार तथा संसदीय सचिव इंदल मडावी यांनी महाआरती कार्यक्रम बोलत होते.

धान का कटोरा म्हणून प्रख्यात असलेल्या छत्तीसगड राज्याला सिंचनापासून पिण्याच्या पाण्याची सोय करून देणारी छत्तीसगड राज्याची जीवनदायी असलेला शिवनाथ नदीचा उगम स्थान असलेल्या कोरची तालुक्यातील गोडरी येथे छत्तीसगड प्रशासनाचे प्रतिनिधी म्हणून आमदार तथा संसदीय सचिव इंदलसाय मडावी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली .

छत्तीसगड राज्यातील चौकी राजनांदगाव रायपूर भिलाई पासून सर्व गावांना सिंचनाच्या सोयीपासून पिण्याच्या पाण्याची सोय करणारी शिवनाथ नदी मुळे छत्तीसगड राज्यातील जनतेला जीवनदायी असलेल्या नदी मुळे आपला जीवन सर्व गोष्टींना परिपक्व आहे अशी धारणा ठेवून छत्तीसगड शासनाने उगमस्थान असलेल्या गोडरी गावात येऊन प्रशासकीय महाआरतीचे २४ सप्टेंबरला आयोजन करण्यात आले होते या महाआरतीचे शासकीय प्रतिनिधी म्हणून आमदार तथा संसदीय सचिव इंदल से मडावी यांना जबाबदारी देऊन प्रशासनाने जबाबदारी दिली होती यावेळी छत्तीसगड राज्यातील बहुसंख्य नागरिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष गडचिरोली जिल्हा परिषद माजी कृषी सभापती नाना नाकाडे होते गडचिरोलीची माजी आमदार नामदेवराव उसेंडी,हे प्रामुख्याने उपस्थित होते.

न्यु एकता आदिवासी क्रीडा मंडळ देळभटटी पाटिलटोला यांच्या सौजन्याने आयोजित एक दिवसीय डे नाईट भव्य प्रो कबड्डी स्पर्धेचे औपचारिक साधून शिवनाथ नदी उगमस्थान दर्शन महाआरती आयोजन करण्यात आले होते.

यावेळी देऊळभटी ग्रामपंचायत माजी सरपंच सौ गीरजा कोरेटी कोरची पंचायत समिती सभापती श्रावन मातलाम, राजेश नैताम, परमेश्वर लोहंबरे, झुल्फिकार खेतानी, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सियाराम हलामी, अविनाश हूमने,चेतन कराडे, स्वप्निल कराडे,आदि मान्यवर उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय जैन यांनी केले तर आभार मनोज अग्रवाल यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ईश्वर कोरेटी, प्रेमलाल उसेंडी, उत्तम कोरेटी, धनपाल टाटपलान,भुवन मुलेटी पंकज बघवा, दयाराम पंधरे, हिरा आडुलवार, अर्जून कोरेटी पन्नालाल फुलारे यांनी विनोद कोरेटी यांच्या मार्गदर्शनाखाली अथक परिश्रम घेतले आहे. गोडरी गाव हे अतिसंवेदनशील असल्याने गडचिरोली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

महाराष्ट्रातील अग्रगण्य साप्ताहिक

सह्याद्रीचा राखणदार

..........................................

..........................................

..........................................

महोदय,

दीपावली भारतीय संस्कृतीतील सणांचा राजा म्हणून सर्वज्ञात असलेला दिवाळी सण. दिवाळी म्हणजे लक्षलक्ष रांगोळ्यांची आरास, लक्षलक्ष दिव्यांचा झगमगाट, फराळांची मेजवानी, फटाक्यांची आतषबाजी, जणू सर्वत्र आनंदाचे उधाण. मागील ५ वर्षापासून वाचकांच्या सेवेस उतरलेले हे अग्रगण्य मल्टीमीडिया साप्ताहिक आपल्यासारख्या सुजाण वाचकांच्या आनंदात दिवाळी अंकाच्या माध्यमातून सहभागी होऊ इच्छित आहे. सह्याद्रीच्या राखणदार चा दिवाळी अंक नाविन्यपूर्ण असणार आहे. आपणा सगळ्यांच्या पसंतीस उतरेल असाच ठेवण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

या अंकात नामवंत साहित्यिकांच्या कसदार लेखणीतून उतरलेले साहित्य आपणास वाचायला मिळणार आहे. प्रतिभावंतांच्या मांदियाळीतील साहित्यिकांच्या साहित्याची व विचाराची गोडी आपणास चाखायला मिळणार आहे. यासोबतच व्यंगचित्र, कविता, चारोळी, वैचारिक, ललित, प्रासंगिक व उद्बोधक अशा विविध पैलूंनी सजलेल्या साहित्याच्या माध्यमातून आम्ही आपल्या मनात उतरण्यासाठी प्रयत्नशील असणार आहोत.

या दिवाळी अंकाच्या माध्यमातून आपल्यांलाही लक्षावधी वाचकांशी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष सुसंवाद साधण्याची संधी व ऋणानुबंध जपण्याची संधी मिळणार आहे. कृपया आपणही आपले साहित्य दिनांक १० ऑक्टोंबर २०२२ पूर्वी पाठवून आम्हांस उपकृत करावे ही विनंती.

मारोती नारायण घुमे
मुख्य संपादक



■ लेखकांनी आपले नाव, पत्ता, मोबाईल नंबर याचा आवर्जून उल्लेख करावा. तसेच स्वत:चे छायाचित्रही सोबत पाठवावे. तुमचे साहित्य युनिककोडमध्ये टाईप करून खाली दिलेल्या ई-मेल आयडीवर मेल करावे.

दिवाळी विशेषांक - २०२२

Print | Video | Online | Live | Event

Email : sahyadricharakhandarbook@gmail.com
Web : sahyadrinews.com
Epaper : epaper.sahyandrinews.com

9011708840 @ sahyandrinews

Head Office :
C/o Matruchaya Bhavan
Opp. Kalyaneshwar Temple,
Karmaveer Ward Warora,
Dist. Chandrapur
(Maharashtra) 442907
office@sahyandrinews.com

सह्याद्री चा राखणदार साप्ताहिक वृत्तपत्र मालक , प्रकाशक , संपादक आशीष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टिसर्व्हिसेस कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून मुद्रित करून मातृछायाभवन कर्मवीर वॉर्ड वरोरा येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही. यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालयाअंतर्गत होईल.

A weekly newspaper `SAHYADRI CHA RAKHANDAR` printed by *Suraj Bhaktraj Ghume* ,sahyandri multiservices, karmveer ward , warora 442907 (M.H ) on behalf of Ashish Maroti Ghume owner, publisher & Editor of sahyadri cha rakhandar` matruchaya bhawan` , karmveer ward warora 442907(M.H) . the editer may not be agree with the published content . in case any objection , the content will be redressed under warora court RNI NO : MAHMAR/2018/77866

CONTACT NUMBER :- Ashish Ghume 9011708840, Suraj Ghume 9673560360 EMAIL :- sahyandrinews@gmail.com EPAPER :- epaper.sahyandrinews.com